प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दिनांक – 19 एप्रिल 2025**

## सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी घेतला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा

### प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दिले निर्देश

श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी गुरुवार, दि. 17 एप्रिल 2025 रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंदर्भात आढावा बैठक घेतली. या प्रसंगी श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि श्रीमती गीता पिल्लई, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) हे उपस्थित होते. श्री. विजय सिंघल यांनी श्री. जीत अदानी, संचालक-एअरपोर्ट, अदानी समूह यांच्यासमवेत श्री. मलय महादेवया, संचालक, अदानी समूह, श्री. बीव्हीजीके शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, एनएमआयएएल, श्री. एन. नामचिवायम, उपाध्यक्ष तथा परिचालन प्रमुख, एल अॅण्ड टी यांच्या उपस्थितीत प्रकल्पाच्या परिचालन सुसज्जतेचे परीक्षण करण्याकरिता आढावा बैठक घेतली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासंबंधी विमानतळ माहिती प्रकाशन (एआयपी) प्रकाशित झाल्यापासून व संचालक, नागरी विमान उड्डाण (डीजीसीए) यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्तीकरिता (Aerodrome License) देण्याकरिता निरीक्षण सुरू असल्याने विमानतळाचे उद्‌घाटन व परिचालन करण्याच्या दृष्टीकोनातून एअरसाइड, लॅन्डस्लाइड आणि टर्मिनल इमारत यांचे काम पूर्ण करणे, कामे पूर्ण करण्यासंदर्भात येणारी आव्हाने जाणून घेणे व या आव्हानांवर मात करून नियोजित वेळेत कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून सदर आढवा बैठकीमध्ये भर देण्यात आला. सवलतधारक एनएमआयएएल यांनी प्रकल्पाचे काम नियोजित कालाधीत पूर्ण करण्याकरिता सर्व प्रयत्न सुरू असल्याबाबत सांगितले.

एनएमआयएएल यांनी एअरसाइडचे काम 100% पूर्ण झाले असून डीजीसीए यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्ती व बीसीएएस यांच्याकडून सुरक्षाविषयक परवानगी प्राप्त करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर असून याबाबत कोणतेही अडथळे नसल्याबाबत ग्वाही दिली. अव्याहत परिचालन सुनिश्चित करण्याकरिता परिचालन सुसज्जता आणि हस्तांतरण (ओआरएटी) चाचणी नियमितपणे सुरू आहे. विविध विमान कंपन्यांनी नवीन विमानतळावर आपल्याला वेळ (स्लॉट) उपलब्ध व्हावी याकरिता अर्ज केला असून डीजीसीए समितीकडून या वेळा निश्चित करण्यात येणार आहेत.

श्री. विजय सिंघल यांनी विमानतळाकरिता भारतीय महामार्ग प्राधिकरण आणि सिडको यांच्यातर्फे विकसित करण्यात येत असलेल्या रस्ते कनेक्टिव्हिटी प्रकल्पाचा देखील आढावा घेतला व विमानतळाचे उद्घाटन होण्यापूर्वी हा प्रकल्प सज्ज करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले.

देशाच्या तसेच महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पाच्या प्रगतीचा अत्यंत बारकाईने आढावा घेण्याकरिता श्री. विजय सिंघल यांच्याकडून दर पंधरवड्याला नियमितपणे आढावा बैठकांचे आयोजन करण्यात येते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रती वर्ष 90 दशलक्ष प्रवासी व 3.2 दशलक्ष टन मालवाहतुकीकरिता नियोजित असून लवकरच सुरू होणाऱ्या विमानतळाच्या टप्पा-1 ची क्षमता प्रती वर्ष 20 दशलक्ष प्रवासी व 0.8 दशलक्ष मालवाहतुकीकरिता नियोजित आहे. सध्याच्या टप्प्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे दोन समांतर टॅक्सी मार्गांसह कोड एफ धावपट्टी, 1 टर्मिनल (टी1), कार्गो टर्मिनल आणि इतर अनेक सहाय्यक पायाभूत सुविधा असणार आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको